एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-
आर्थिक वर्ष सन २०१५-१६ साठी सहायक
अनुदान (वेतन) खर्चासाठी वनामती,नागपूर
या प्रशिक्षण संस्थेस अनुदान वितरीत
करण्याबाबत- (३ रा हप्ता).

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : टिआरएन ०४१५/प्र.क्र.५१/१५/१८-ब
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१६.

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०१५/प्र.क्र.७९/२०१५/२५, दिनांक ८.४.२०१५.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र : टिआरएन-०४१५/प्र.क्र.५१/१५/१८-ब, दि. २४.४.२०१५.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएन-०४१५/प्र.क्र.५१/१५/१८-ब, दि.१५.९.२०१५, दिनांक २९.१२.२०१५ व दि.१२.१.२०१६.

शासन निर्णय : -

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २० जानेवारी,२०१४ अनुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेला सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी वरील वाचा येथील संदर्भ क्र.१ येथील परिपत्रकान्वये **रु. २०९४.९७ लाख (रुपये दोन हजार चौ-याण्णव लाख सत्याण्णव हजार फक्त)** इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली असून, त्यापैकी **रु.** ६७७.६५ **लक्ष** (**रुपये सहाशे सत्त्याहत्तर लाख पासष्ट हजार फक्त**) इतके अनुदान वरील वाचा येथील संदर्भ क्र.२ ते ३ येथील शासन निर्णयांद्वारे वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती),नागपूर या प्रशिक्षण संस्थेस वितरीत करण्यात आले आहे.

२. चालू आर्थिक वर्षासाठी उपलब्ध वार्षिक तरतूदीमधून वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती),नागपूर या संस्थेला खालीलप्रमाणे अनुदान मंजूर करुन अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे: -

लेखाशीर्ष	अर्थसंकल्पीत वितरण प्रणालीतील वितरीत तरतूद (रु. लाखात)
लेखाशीर्ष ए-४-२०७० इतर प्रशासकीय सेवा ००-००३-प्रशिक्षण (००)(११) वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान, ३६. सहायक अनुदान -(वेतन) (२०७००८६२)	३.४०
एकूण	३.४०

३. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही, याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र १५ दिवसांच्या आत शासनास सादर करावे.

४. वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेने वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.४.२०१५ मधील निदेशांनुसार त्यांचा आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील खर्च मंजूर अनुदानाइतका सिमित ठेवावा.

५. सदर अनुदान उपरोक्त वाचा येथील अनु.क्र.२ व ३ नुसार वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (Utilisation Certificate) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर व शासनास **१५ मार्च, २०१६** पर्यंत सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे.

६. तसेच, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेने सदर आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (Utilisation Certificate) महालेखापाल,लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

७. वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

८. वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेचे आहरण व संवितरण अधिकारी यांना संस्थेस वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम रु. ३.४० लक्ष (रुपये तीन लक्ष चाळीस हजार फक्त) आहरीत करावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०३१२०३३०८५०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Haridas Bhogle

Digitally signed by Santosh Haridas Bhogle
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Santosh Haridas Bhogle
Date: 2016.02.03 12:03:10 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)

उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

१ महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१,मुंबई,

२ महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२,नागपूर,

३ अ.मु.स.(सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

४ महासंचालक, यशदा, पुणे,

५ संचालक, वनामती, नागपूर

६ लेखाधिकारी, वनामती, नागपूर (३ जादा प्रतींसह),

७ सहसंचालक, लेखा व कोषागारे, (संगणक शाखा), मुंबई,

८ जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर,

९ उप कोषागार कार्यालय, नागपूर,

१० वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प १४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

११ अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन क्र. २५, मुंबई-३२.

१२ निवड नस्ती.